**म. सं. कौ.हि.अ. नं.५९/२०२१**

**नि.क्र.२४ लगत**

मी याद्वारे शपथपूर्वक निवेदन करतो /करते की,

माझे नांव – बाळासाहेब शाहुराव गायकवाड,

सामनेवालातर्फे साक्षीदार क्र.१ चा शपथेवर ऊर्वरीत उलटतपास विधीज्ञ श्री.ए.आर.लबडे यांचे मार्फत -

११. माझे सहावीपर्यंतचे शिक्षण झालेले आहे. मला लिहीता वाचता येते. अर्जदाराच्या आईवडीलाने मला त्रास दिल्याबाबत मी पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दिली नाही. हर्षद या माझ्या मुलाचा ताबा मिळण्याकरीता मी प्रयत्न केला. मी, माझी पत्नी व मुलगा हर्षद यास घेवून येण्याकरीता अर्जदाराच्या माहेरी गेलो होतो अशा प्रकारे मी मुलाचा ताबा मिळण्याकरीता प्रयत्न केला होता. मी नक्की अर्जदाराच्या माहेरी कधी गेलो होतो ते मला सांगता येणार नाही. हर्षदचा ताबा मिळण्याकरीता मी जिल्हा न्यायालय अहमदनगर मध्ये अर्ज दाखल केला नव्हता.

१२. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार हे माझ्यापासुन वेगळे राहत असल्यापासुन त्यांना कुणाचा आधार नाही. साक्षीदार परत सांगतो की, त्यांना आधार आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार हे वेगळे राहत असल्यापासुन त्यांना माझा आधार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मौजे ताजनापुर ता.शेवगाव येथील गट क्र.२४/३/अ या गटामध्ये माझे वडीलांच्या नावे ९० गुंठे शेतजमीन आहे.

१३. हे म्हणणे खरे नाही की, मी मिस्त्री व गवंडी काम करतो. हे म्हणणे खरे नाही की, मला त्या कामापासुन दरमहा ३० ते ४० हजार रुपये मिळतात. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या जमीनीमध्ये गहु, ऊस, कापुस अशी बागायती शेती करतो व त्यापासुन मला दरसाल चार ते पाच लाख रुपये उत्पन्न मिळते. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या पत्नीस मारहाण करुन तिला घरातुन हाकलुन दिलेले आहे. मी भोळसर असल्याबाबत माझ्याकडे कोणताही पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी शपथपत्रात खोटा मजकुर नमुद केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृति

sd/-

दिनांक- ०९.०७.२०२५

(डी.आर.कुलकर्णी)
प्रथमवर्ग न्यायदंडाधीकारी
कोर्ट नं. ३, शेवगाव.